जा.क्र. 6495/16
धर्मादाय आयुक्त भवन.
३ रा मजला, ८३, डॉ. अॅनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दुरध्वनी क्रमांक २४९३५४३४, २४९३५४९०
फॅक्स २४९७६४२०.
16·12·2016

पहा :- १. सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिनियम क्र. एसआरव्ही. २००४/ प्र.क्र. १५ /०४/१२ दिनांक २५ मे, २००६(बदली अधिनियम, २००५).

२. सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ११.०२.२०१५ रोजीचे शासन निर्णय.

**परिपत्रक क्र.489 दिनांक 16/12/2016**

या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, दरवर्षी होणाऱ्या सर्वसाधारण बदल्यांबाबत विभागीय कार्यालयांकडून मागविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय कारणास्तव तसेच विनंती बदल्यांबाबतची माहिती विहित मुदतीत मुख्यालयास प्राप्त होत नाही. तसेच बदलीस पात्र किंवा विनंतीने बदलीसाठीचे अर्ज बरेच कर्मचारी त्यांच्या विभाग प्रमुखांमार्फत न पाठवता वैयक्तीकरित्या परस्पर मुख्यालयात वर्षभरात केव्हाही सादर करतात.

या परिपत्रकाव्दारे सर्व विभागीय कार्यालयांना सुचित करण्यात येते की, दरवर्षी होणाऱ्या सर्वसाधारण बदल्यांबाबत उपरोक्त संदर्भीय बदली अधिनियम २००५ अन्वये बदलीस पात्र असलेल्या कर्मचाऱ्यांची नावे तसेच विनंती बदलीचे अर्ज सादर करणाऱ्या कर्मचाऱ्यांची स्वतंत्र यादी सोबत जोडलेल्या विवरणपत्रांसह दरवर्षी १५ जानेवारीपर्यंत मुख्यालयात विभागीय कार्यालयांमार्फतच (धर्मादाय सह आयुक्त कार्यालय) सादर करावी. कोणत्याही कर्मचाऱ्याने वैयक्तीकरित्या परस्पर बदलीसाठी अर्ज मुख्यालयात सादर करु नये.

कृ.मा.प.

तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.११.०२.२०१५ च्या शासन निर्णयानुसार कोणीही कर्मचारी बदलीबाबत, बदली प्राधिकाऱ्यावर कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव किंवा इतर बाह्य दबाव आणणार नाही. असे निदर्शनास आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

उपरोक्त सर्व बाबी आपले कार्यालयातील तसेच आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांतील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(श.भा. सावळे)
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रतः-

१. धर्मादाय सह आयुक्त,सर्व.
२. धर्मादाय उप आयुक्त,सर्व.
३. सहायक धर्मादाय आयुक्त,सर्व.
४. अधिक्षक (आस्थापना),सर्व.
५. कार्यालयीन नोटीस बोर्ड.
६. परीपत्रक नस्ती.

## प्रशासकीय बदली बाबत प्राप्त झालेल्या अर्जांचा तपशिल

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | सध्याचे कार्यालयाचे नाव | सध्याच्या कार्यालयात केव्हापासून कार्यरत आहेत. | सध्याच्या पदावर केव्हापासून कार्यरत | स्वग्राम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

## विनंती बदली बाबत प्राप्त झालेल्या अर्जांचा तपशिल

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव व पदनाम | सध्याचे कार्यालयाचे नाव | सध्याच्या पदावर/ सवंर्गात केव्हापासून कार्यरत | स्वग्राम | बदलीचे पसंतीक्रमानुसार तीन ठिकाणे | बदलीचे कारण | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

टिप – विनंती बदलीबाबत पसंतीक्रमानुसार तीन ठिकाणांचा संबंधित कर्मचाऱ्यांकडुन विकल्प अर्ज स्वाक्षरीसह भरुन घेण्यात यावा.